श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## रास पंचाध्याय (10.29)



भक्तों मे ज्यों गोपी श्रेष्ठ, मुनियों में ज्यों व्यास।
पुराणों में ज्यों भागवतम्, लीला में महारास।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**दशमः स्कंधः**

**अथैकोनत्रिंशोऽध्यायः**

**श्रीशुक उवाच**

**भगवानपि ता रात्रीः(श्), शरदोत्फुल्लमल्लिकाः ।**
**वीक्ष्य रन्तुं(म्) मनश्चक्रे, योगमायामुपाश्रितः ॥ 1॥**

शरदोत् + फुल्ल+ मल्लिकाः, योगमाया+ मुपाश्रितः

श्रीशुक म्हणतात - शरद ऋतूतील पौर्णिमेची रात्र होती.मोगरा वगैरे सुगंधी फुले उमलली होती.ते पाहून भगवंतांनी योगमायेचा आश्रय करून,रासक्रीडा करण्याचा संकल्प केला.

**तदोडुराजः(ख्) ककुभः(ख्) करैर्मुखं(म्),**
**प्राच्या विलिम्पन्नरुणेन शन्तमैः ।**
**स चर्षणीनामुदगाच्छुचो मृजन्,**
**प्रियः(फ्) प्रियाया इव दीर्घदर्शनः ॥ 2॥**

विलिम्+ पन् + नरुणेन, चर्षणीना+ मुदगाच् +छुचो

त्याचवेळी,फार दिवसांनीं भेटलेल्या पतीने प्रियेच्या मुखाला केशर वगैरे लावून तिचा विरहताप दूर करावा,त्याप्रमाणे चंद्रमा पूर्वदिशेचे मुख आपल्या शीतल किरणरूप करांनी उदयकालीन रंगाने तांबूस करीत व चराचराचा ताप हरीत उदयाला आला.

दृष्ट्वा कुमुद्वन्तमखण्डमण्डलं(म्),
रमाननाभं(न्) नवकुं(ङ्)कुमारुणम्।
वनं(ञ्) च तत्कोमलगोभिरं(ञ्)जितं(ञ्),
जगौ कलं(वँ) वामदृशां(म्) मनोहरम् ॥ 3॥

कुमुद्+ वन्त+ मखण्ड+ मण्डलं(म्),

नव+ कुं(ङ्)कुमा+ रुणम्, तत्को+ मलगो+ भिरं(ञ्)जितं(ञ्)

श्रीकृष्णांनी ताज्या केशरासारखे लालसर व लक्ष्मीच्या मुखकमलासारखे मनोहर पूर्ण चन्द्रबिंब आणि त्याच्या कोमल किरणांनी व्यापलेले वृंदावन पाहिले आणि वेणूवर व्रजसुंदरींना प्रिय असणारे गीत वाजविण्यास सुरुवात केली.

निशम्य गीतं(न्) तदनङ्गवर्धनं(वँ),
व्रजस्त्रियः(ख्) कृष्णगृहीतमानसाः ।
आजग्मुरन्योन्यमलक्षितोद्यमाः(स्),
स यत्र कान्तो जवलोलकुण्डलाः ॥ 4॥

तदनङ्ग+वर्धनं(वँ), कृष्ण+ गृही+ तमानसाः, आजग्मुरन्+ योन्य+ मलक्षितो+ द्यमाः(स्)

श्यामसुंदरांनी ज्यांचे मन आधीच आपल्या अधीन करून घेतले होते, त्या गोपी बासरीचे ते प्रेमवर्धक स्वर ऐकताच एकमेकींना न कळवताच प्रियतम जेथे होता,तिकडे जाण्यास निघाल्या.त्यावेळी भरभर चालण्याने त्यांच्या कानातील कुंडले झोके घेत होती.

दुहन्त्योऽभिययुः(ख्) काश्चिद्, दोहं(म्) हित्वा समुत्सुकाः ।
पयोऽधिश्रित्य सं(यँ)याव- मनुद्वास्यापरा ययुः ॥ 5॥

दुहन्त्योऽ+भिययुः(ख्), पयोऽ+ धिश्रित्य, मनुद् + वास् + यापरा

बासरीचे स्वर ऐकताच ज्या गोपी गाईंची धार काढीत होत्या ,त्या अत्यंत उत्सुक होऊन धार काढणे अर्धवट टाकून निघाल्या, ज्या दूध तापवित होत्या, त्या उतू जाणारे दूध तसेच सोडून, आणि च्या लापशी करीत होत्या, त्या भांडे चुलीवरून खाली न उतरविताच निघाल्या.

परिवेषयन्त्यस्तद्धित्वा, पाययन्त्यः(श्) शिशून् पयः ।
शुश्रूषन्त्यः(फ्) पतीन् काश्चि- दश्नन्त्योऽपास्य भोजनम् ॥ 6॥

परिवे+ षयन्त्यस्+ तद्+ धित्वा, शुश्रू+षन्त्यः(फ्), दश् + नन्त्योऽ+ पास्य

ज्या जेवावयास वाढीत होत्या, त्या वाढण्याचे काम सोडून, ज्या मुलांना दूध पाजीत होत्या, त्या पाजणे सोडून, ज्या पतींची सेवा करीत होत्या त्या सेवा सोडून आणि ज्या स्वतः जेवित होत्या, त्या भोजन करणे सोडून निघाल्या.

**लिम्पन्त्यः(फ्) प्रमृजन्त्योऽन्या, अं(ञ्)जन्त्यः(ख्) काश्च लोचने ।**

**व्यत्यस्तवस्त्राभरणाः(ख्), काश्चित् कृष्णान्तिकं(यँ) ययुः ॥ 7॥**

प्रमृजन्+ त्योऽन्या, व्यत्यस्+ तवस्त्रा+भरणाः(ख्)

काही गोपी आपल्या शरीराला चंदन आणि उठणे लावीत होत्या, तर काही डोळ्यांमध्ये काजळ घालीत होत्या ,त्या ते करावयाचे सोडून आणि उलट-सुलट वस्त्रालंकार घालून श्रीकृष्णांकडे गेल्या.

**ता वार्यमाणाः(फ्) पतिभिः(फ्), पितृभिर्भ्रातृबन्धुभिः ।**

**गोविन्दापहृतात्मानो, न न्यवर्तन्त मोहिताः ॥ 8॥**

पितृभिर् + भ्रातृबन्धुभिः, गोविन्दा+ पहृतात् + मानो

पतींनी, पित्यांनी,भाऊ आणि जाती बांधवांनी त्यांना अडविले, तरी गोविंदाने चित्त हरण केल्यामुळे त्या इतक्या मोहित झाल्या होत्या की, त्या थांबल्या नाहीत.

**अन्तर्गृहगताः(ख्) काश्चिद्- गोप्योऽलब्धविनिर्गमाः ।**

**कृष्णं(न्) तद्भावनायुक्ता, दध्युर्मीलितलोचनाः ॥ 9॥**

अन्तर्+ गृहगताः(ख्),गोप्योऽ+लब्ध+ विनिर्गमाः, तद्+ भावना+ युक्ता, दध्युर्मी+लितलोचनाः

त्यावेळी काही गोपी घरामध्ये होत्या. त्यांना बाहेर पडणे अशक्य झाले. तेव्हा त्यांनी आपले डोळे बंद केले आणि त्या अतिशय तन्मयतेने श्रीकृष्णांचे ध्यान करू लागल्या.

**दुः(स्)सहप्रेष्ठविरह- तीव्रतापधुताशुभाः ।**

**ध्यानप्राप्ताच्युताश्लेष- निर्वृत्या क्षीणमङ्गलाः ॥ 10॥**

दुः(स्)सह+ प्रेष्ठ+ विरह, तीव्रता+ पधुता+ शुभाः ,ध्या+ नप्राप्ता+ च्युताश्लेष,

आपल्या प्रियतमा श्रीकृष्णांच्या असह्य विरहाच्या तीव्र वेदनांनी त्यांच्या हृदयात इतकी व्यथा निर्माण झाली की, त्यामुळे त्यांचे पाप भस्म होऊन गेले आणि ध्यानामध्ये श्रीकृष्णांना दिलेल्या आलिंगनाच्या सुखाने त्यांचे पुण्यही संपले.(अशा रीतीने पाप पुण्य संपल्यामुळे त्यांचे गुणमेय देह नाहीसे झाले)

**तमेव परमात्मानं(ञ्),जारबुद्ध्यापि सङ्गताः।**

**जहुर्गुणमयं(न्) देहं(म्), सद्यः(फ्) प्रक्षीणबन्धनाः ॥ 11॥**

जार+ बुद्ध्यापि, जहुर्+ गुणमयं(न्)

जारबुद्धीने का असेना, त्या परमपुरुषाशी त्यांचे मिलन झाल्यामुळे त्यांचे कर्म बंधन तत्काळ नाहीसे झाले. त्यामुळे त्यांनी त्रिगुणात्मक देहाचा त्याग केला (व त्या दिव्य देही झाल्या.)

**राजोवाच**

**कृष्णं(वँ) विदुः(फ्) परं(ङ्) कान्तं(न्), न तु ब्रह्मतया मुने ।**

गुणप्रवाहोपरमस्- तासां(ङ्) गुणधियां(ङ्) कथम् ॥ 12॥

गुण+ प्रवाहो+ परमस्

राजाने विचारले- मुनिवर्य! श्रीकृष्णांना गोपी फक्त आपला परम प्रियतमच मानित होत्या. त्यांना ते काही ब्रह्म वाटत नव्हते. अशा प्रकारे गुणांमध्येच आसक्त असणाऱ्या त्यांच्या बाबतीत गुणांचा प्रवाह रूप असलेल्या या संसाराची निवृत्ती होणे कसे शक्य आहे?

श्रीशुक उवाच

उक्तं(म्) पुरस्तादेतत्ते, चैद्यः(स्) सिद्धिं(यँ) यथा गतः ।

द्विषन्नपि हृषीकेशं(ङ्), किमुताधोक्षजप्रियाः ॥ 13॥

पुरस्ता+ देतत् + ते, द्विषन् + नपि, किमुताधो+ क्षजप्रियाः

श्रीशुक म्हणाले- मी तुला यापूर्वीच सांगितले होते की, चेदीराज शिशुपालने भगवंताबद्दल द्वेषभाव ठेवूनही त्याला भगवत् स्वरूपाची प्राप्ती झाली. तर मग ज्या गोपी श्रीकृष्णांवर अनन्य प्रेम करतात, त्या त्यांना प्राप्त होतील, यात काय आश्चर्य?

नृणां(न्) निः(श्)श्रेयसार्थाय, व्यक्तिर्भगवतो नृप ।

अव्ययस्याप्रमेयस्य, निर्गुणस्य गुणात्मनः ॥ 14॥

निः(श्)श्रे+ यसार्थाय, व्यक्तिर् + भगवतो, अव्ययस् + याप्रमे+ यस्य

हे राजा! अविनाशी, अनंत, निर्गुणा असून त्रिगुणात्मक प्रकृतीचे नियंते असणाऱ्या भगवंतांचे प्रकट होणे, हे माणसाच्या परम कल्याणासाठीच आहे.

कामं(ङ्) क्रोधं(म्) भयं(म्) स्नेह- मैक्यं(म्) सौहृदमेव च ।

नित्यं(म्) हरौ विदधतो, यान्ति तन्मयतां(म्) हि ते ॥ 15॥

म्हणून काम ,क्रोध भय, स्नेह ,नातेसंबंध किंवा भक्ती यापैकी कोणत्याही भावनेने भगवंताशी नित्य जोडले गेलेले जीव त्या भगवंताशी एकरूप होता.

न चैवं(वँ) विस्मयः(ख्) कार्यो, भवता भगवत्यजे ।

योगेश्वरेश्वरे कृष्णे, यत एतद् विमुच्यते ॥ 16॥

तुला योगेश्वरांचे सुद्धा ईश्वर, अजन्मा भगवंताच्या बाबतीत मुळीच आश्चर्य वाटायला नको. कारण त्यांच्या केवळ संकल्प आणि स्थावरादिकही मुक्त होतात.

ता दृष्ट्वान्तिकमायाता, भगवान् व्रजयोषितः ।

अवदद् वदतां(म्) श्रेष्ठो, वाचः(फ्) पेशैर्विमोहयन् ॥ 17॥

दृष्ट्वान् + तिकमायाता, पेशैर् + विमो+ हयन्

त्या गोपी जवळ आलेल्या पाहून वक्त्यात श्रेष्ठ असणाऱ्या भगवंतांनी आपल्या वाक्‌चातुर्याने त्यांना मोहित करीत म्हटले.

## श्रीभगवानुवाच

**स्वागतं(वँ) वो महाभागाः(फ्), प्रियं(ङ्) किं(ङ्) करवाणि वः ।**

**व्रजस्यानामयं(ङ्) कच्चिद्, ब्रूतागमनकारणम् ॥ 18॥**

व्रजस्या+ नामयं(ङ्), ब्रूता+गमनका+रणम्

श्रीभगवान म्हणाले- महा भाग्यवान गोपींनो! तुमचे स्वागत असो, तुम्हाला आवडणारी कोणती गोष्ट मी करू? व्रजामध्ये सर्व कुशल आहे ना? यावेळी तुम्ही इकडे? सांगा बरे!

**रजन्येषा घोररूपा, घोरसत्त्वनिषेविता ।**

**प्रतियात व्रजं(न्) नेह, स्थेयं(म्) स्त्रीभिः(स्) सुमध्यमाः ॥ 19॥**

घोर+ सत्त्व+ निषेविता

हे सुंदरींनो! आधीच ही रात्र भीतीदायक. त्यात यावेळी हिंस्र प्राणी इकडे-तिकडे फिरत असतात. तुम्ही घरी परत जा. स्त्रियांनी येथे थांबणे बरे नव्हे.

**मातरः(फ्) पितरः(फ्) पुत्रा, भ्रातरः(फ्) पतयश्च वः ।**

**विचिन्वन्ति ह्यपश्यन्तो, मा कृढ्वं(म्) बन्धुसाध्वसम् ॥ 20॥**

विचिन् + वन्ति, ह्य+ पश्यन्तो, बन्धु+ साध्व+सम्

तुम्ही दिसत नाहीत.असे पाहून तुमचे आई-वडील, पती, पुत्र किंवा भाऊ तुम्हाला शोधतील. त्यांना घाबरून सोडू नका.

**दृष्टं(वँ) वनं(ङ्) कुसुमितं(म्), राकेशकररं(ञ्)जितम् ।**

**यमुनानिललीलैजत्-तरुपल्लवशोभितम् ॥ 21॥**

यमुना+ निललीलै+ जत्, तरु+ पल्लवशो+ भितम्

चंद्रांच्या किरणांनी धवल झालेले, यमुने वरील वाऱ्याच्या मंद गतीने हलणाऱ्या झाडांच्या पानांनी शोभणारे, फुलांनी बहरलेले हे वन तुम्ही पाहिले ना!

**तद् यात मा चिरं(ङ्) गोष्ठं(म्), शुश्रूषध्वं(म्) पतीन् सतीः ।**

**क्रन्दन्ति वत्सा बालाश्च, तान् पाययत दुह्यत ॥ 22॥**

शुश्रू+ षध्वं(म्), क्रन्+ दन्ति

तर आता घरी परत जा. हे पतिव्रतानों! उशिरा करू नका. आपल्या पतींची सेवा करा. तुमच्या घरातील मुले रडत असतील. त्यांना दूध पाजा. आणि वासरे हंबरत असतील, त्यांना गायांजवळ सोडून गायांच्या धारा काढा.

**अथवा मदभिस्नेहाद्-भवत्यो यन्त्रिताशयाः ।**

**आगता ह्युपपन्नं(वँ) वः(फ्), प्रीयन्ते मयि जन्तवः ॥ 23॥**

मदभिस् + नेहाद् , यन्त्रिता+ शयाः, ह्युप+ पन्नं(वँ)

किंवा माझ्यावरील अत्यंत प्रेमाने पराधीन होऊन तुम्ही त्याला असाल तर तेही योग्यच आहे. कारण जगातील सर्वच प्राणी माझ्यावर प्रेम करतात.

**भर्तुः(श्) शुश्रूषणं(म्) स्त्रीणां(म्), परो धर्मो ह्यमायया ।**

**तद्बन्धूनां(ञ्) च कल्याण्यः(फ्), प्रजानां(ञ्) चानुपोषणम् ॥ 24॥**

तद्+ बन्धूनां(ञ्)

कल्याणी गोपींनो! पतीची आणि त्यांच्या बांधवांची निष्कपट भावाने सेवा करणे आणि मुला- बाळांचे पालन-पोषण करणे हा स्त्रियांचा श्रेष्ठ धर्म आहे.

**दुः(श्)शीलो दुर्भगो वृद्धो, जडो रोग्यधनोऽपि वा ।**

**पतिः(स्) स्त्रीभिर्न हातव्यो, लोकेप्सुभिरपातकी ॥ 25॥**

लोकेप् + सुभिरपा+ तकी

ज्या स्त्रियांना उत्तम लोक प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल, त्यांनी पापी सोडून अन्य कोणत्याही प्रकारच्या पतीचा त्याग करू नये. मग तो वाईट स्वभावाचा, भाग्यहिन, वृद्ध, मूर्ख, रोगी किंवा निर्धन का असेना!

**अस्वर्ग्यमयशस्यं(ञ्) च, फल्गु कृच्छ्रं(म्) भयावहम् ।**

**जुगुप्सितं(ञ्) च सर्वत्र, औपपत्यं(ङ्) कुलस्त्रियाः ॥ 26॥**

अस्+ वर्ग्य+ मयशस्यं(ञ्), जुगुप्+ सितं(ञ्), औप+ पत्यं(ङ्)

कुलीन स्त्रियांनी परपुरुषाकडे जाणे तर सर्व थैव निंद्यच आहे. हे कुकर्म स्वर्गप्राप्तीला विघातक, अपकीर्तीकारक, हीन, कष्टप्रद आणि नरक भयाला कारण आहे.

**श्रवणाद् दर्शनाद् ध्यानान्- मयि भावोऽनुकीर्तनात् ।**

**न तथा सन्निकर्षेण, प्रतियात ततो गृहान् ॥ 27॥**

सन् + निकर्षेण

गोपींनो! माझ्या लीला आणि गुणांच्या श्रवणाने, रूपाच्या दर्शनाने, या सर्वांचे कीर्तन आणि ध्यान केल्याने, माझ्यावरील अनन्य प्रेमाची जशी प्राप्ती होते, तशी माझ्याजवळ राहून होत नाही. म्हणून तुम्ही घरी परत जा.

**श्रीशुक उवाच**

**इति विप्रियमाकर्ण्य ,गोप्यो गोविन्दभाषितम् ।**

**विषण्णा भग्नसं(ङ्)कल्पाश्-चिन्तामापुर्दुरत्ययाम् ॥ 28॥**

विप्रियमा+ कर्ण्य, भग्न+ सं(ङ्)कल्पाश्, चिन्तामा+ पुर्दुरत् + ययाम्

श्रीशुक म्हणतात- भगवान श्रीकृष्णांचे हे स्वतःला न आवडणारे भाषण ऐकून गोपी खिन्न झाल्या. त्यांच्या आशा धुळीला मिळालेल्या त्यांना अपार चिंता लागून राहिली.

**कृत्वा मुखान्यव शुचः(श्) श्वसनेन शुष्यद्**

**बिम्बाधराणि चरणेन भुवं(म्) लिखन्त्यः ।**

**अस्रैरुपात्तमषिभिः(ख्) कुचकुं(ङ्)कुमानि,**

**तस्थुर्मृजन्त्य उरुदुःखभराः(स्) स्म तूष्णीम् ॥ 29॥**

अस्+ रैरुपात्+ तमषिभिः(ख्), तस्थुर्+ मृजन्त्य

शोकामुळे चाललेल्या उष्ण श्वासांमुळे त्यांचे तोंडल्यासारखे लाल ओठ पांढुरके झाले. त्यांनी माना खाली घातल्या आणि पायांच्या नखांनी त्या जमीन उखरू लागल्या. डोळ्यातून काजळासह वाहणारे अश्रू वक्षःस्थळापर्यंत पोहोचले आणि तेथे लावलेले केशर त्यांनी धुवून टाकले. त्यांचे हृदय दुखणे इतके भरून आले की, त्यांच्या तोंडून शब्द कुठे ना.

**प्रेष्ठं(म्) प्रियेतरमिव प्रतिभाषमाणं(ङ्),**

**कृष्णं(न्) तदर्थविनिवर्तितसर्वकामाः ।**

**नेत्रे विमृज्य रुदितोपहते स्म किं(ञ्)चित्**

**सं(म्)रम्भगद्गदगिरोऽब्रुवतानुरक्ताः ॥ 30॥**

तदर्थ+ विनिवर्+ तित+ सर्वकामाः, सं(म्)रम्भ+ गद्गदगिरोऽ+ ब्रुवता+ नुरक्ताः

कृष्णासाठी गोपींनी सर्वकामना सोडून दिल्या होत्या. श्रीकृष्णांवरच त्यांचे अनन्य प्रेम होते . त्यांचे हे निष्ठुर बोल ऐकून त्यांना रडू कोसळले. रडून रडून लाल झालेली डोळे पुसून प्रणयकोपामुळे सद्गदित झालेल्या वाणीने त्या प्रियतमाला म्हणू लागल्या.

**गोप्य ऊचुः**

**मैवं(वँ) विभोऽर्हति भवान् गदितुं(न्) नृशं(म्)सं(म्),**

**सन्त्यज्य सर्वविषयां(म्)स्तव पादमूलम् ।**

**भक्ता भजस्व दुरवग्रह मा त्यजास्मान्**

**देवो यथाऽऽदिपुरुषो भजते मुमुक्षून् ॥ 31॥**

सन् + त्यज्य

गोपी म्हणाल्या- हे प्रभो! आपण असे निष्ठुर बोलू नये. आम्ही सर्व काही सोडून फक्त तुमच्या चरणावरच प्रेम करीत आहोत. तुम्ही स्वतःचा निर्णय घ्यायला स्वतंत्र आहात. तरीही जसे आदि पुरुष मुमुक्षू भक्तांना भजतात तसेच तुम्ही आमच्यावर प्रेम करा. आमचा त्याग करू नका.

**यत्पत्यपत्यसुहृदामनुवृत्तिरङ्ग**

**स्त्रीणां(म्) स्वधर्म इति धर्मविदा त्वयोक्तम् ।**

**अस्त्वेवमेतदुपदेशपदे त्वयीशे**

**प्रेष्ठो भवां(म्)स्तनुभृतां(ङ्) किल बन्धुरात्मा ॥ 32॥**

यत्पत्+यपत्य+सुहृदा+मनुवृत्तिरङ्ग, अस्त्वे+ वमे+तदुपदे+शपदे, भवां(म्)स्+ तनुभृतां(ङ्)

हे प्रियतमा! धर्माचे मर्म तुम्ही जाणता. आपले पती, पुत्र आणि बांधवांची सेवा करणे हा स्त्रियांचा स्वधर्म आहे, असे तुम्ही म्हणालात. तर मग या उपदेशानुसार आम्हाला सर्वांचे पती असणाऱ्या तुमचीच सेवा केली पाहिजे. कारण तुम्हीच या उपदिशाचे विषय आहात. तुम्हीच तर शरीर धारण करणाऱ्यांचे प्रियतम आत्मा आणि बंधू आहात.

**कुर्वन्ति हि त्वयि रतिं(ङ्) कुशलाः(स्) स्व आत्मन्**

**नित्यप्रिये पतिसुतादिभिरार्तिदैः(ख्) किम् ।**

**तन्नः(फ्) प्रसीद परमेश्वर मा स्म छिन्द्या**

**आशां(न्) भृतां(न्) त्वयि चिरादरविन्दनेत्र ॥ 33॥**

पतिसुता+ दिभिरार्+ तिदैः(ख्),

आत्मज्ञानी लोक तुमच्यावरच प्रेम करतात. कारण तुम्ही नित्य प्रिय असा त्यांचा आत्मा आहात. असे असता अनित्य आणि दुःखद पती-पुत्रांशी आम्हाला काय करायचे आहे? हे परमेश्वरा! म्हणून आमच्यावर प्रसन्न व्हा. आणि हे कमलनयना! पुष्कळ दिवसांपासून तुमच्याच ठिकाणी जोपासलेली अशा धुळीला मिळवू नका.

**चित्तं(म्) सुखेन भवतापहृतं(ङ्) गृहेषु**

**यन्निर्विशत्युत करावपि गृह्यकृत्ये ।**

**पादौ पदं(न्) न चलतस्तव पादमूलाद्-**

**यामः(ख्) कथं(वँ्) व्रजमथो करवाम किं(वँ्) वा ॥ 34॥**

यन् + निर् + विशत्युत

हे मनमोहना! आज पर्यंत आमचे चित्त घरात रमत असे. म्हणूनच आमचे हातही घर कामात लागत. परंतु आनंद स्वरूप तुम्ही आमचे ते चित्त सहज चोरून घेतले. त्यामुळे आमचे हे पाय तुमचे चरण कमल सोडून एक पाऊलभर सुद्धा दुसरीकडे जाण्यास तयार नाहीत. तर मग आम्ही व्रजामध्ये मध्ये कसे जावे ?आणि तिथे जाऊन काय करावे?

**सिञ्चाङ्ग नस्त्वदधरामृतपूरकेण**

**हासावलोककलगीतजहृच्छयाग्निम् ।**

**नो चेद् वयं(वँ्) विरहजाग्न्युपयुक्तदेहा**

**ध्यानेन याम पदयोः(फ्) पदवीं(म्) सखे ते ॥ 35॥**

नस् + त्वदधरा+मृतपू+ रकेण,

हासावलो+ककलगी+ तजहृच् + छयाग्निम्, विरहजाग् + न्युप+युक्तदेहा

हे प्रिय सख्या,! तुमचे मधुर हास्य, प्रेमपूर्ण कटाक्ष आणि मनोहर संगीताने आमच्या हृदयामध्ये तुमच्याविषयीच्या प्रेमाची जी आग धगधगत आहे, ती तुम्ही तुमच्या अधरामृताच्या प्रवाहाने भिजवून टाका. नाहीतर, आम्ही तुमच्या विरह- व्यथेच्या आगीने आमची भौतिक शरीरिक जाळून ध्यानाने तुमच्या चरण कमलाची प्राप्ती करून घेऊ.

यर्ह्यम्बुजाक्ष तव पादतलं(म्) रमाया

दत्तक्षणं(ङ्) क्वचिदरण्यजनप्रियस्य ।

अस्प्राक्ष्म तत्प्रभृति नान्यसमक्षमङ्ग

स्थातुं(न्) त्वयाभिरमिता बत पारयामः ॥ 36॥

यर्+ ह्यम् + बुजाक्ष, क्वचिदरण् + यजनप्रियस्य, अस् + प्राक्ष्म, नान् + यसमक्ष+ मङ्ग

हे कमलनयना! वनवासी लोक तुम्हाला प्रिय आहेत म्हणूनच ज्या चरण कमळांच्या सेवेची संधी लक्ष्मीला सुद्धा क्वचितच मिळते, त्या तुमच्या चरणांचा स्पर्श आम्हाला प्राप्त झाला . त्या दिवसापासून तुमच्याकडून आनंद मिळवलेल्या आम्ही दुसऱ्या कोणासमोर एक क्षण सुद्धा थांबण्यास समर्थ ठरलो आहोत. मग सेवा तर दूरच!

श्रीर्यत्पदाम्बुजरजश्चकमे तुलस्या

लब्ध्वापि वक्षसि पदं(ङ्) किल भृत्यजुष्टम् ।

यस्याः(स्) स्ववीक्षणकृतेऽन्यसुरप्रयासस्-

तद्वद् वयं(ञ्) च तव पादरजः(फ्) प्रपन्नाः ॥ 37॥

श्रीर्यत् + पदाम् + बुजरजश् + चकमे, स्ववी+ क्षणकृतेऽन् + यसुरप्रयासस्

स्वामी! जिचा कृपा कटाक्ष प्राप्त करून घेण्यासाठी इतर देव प्रयत्न करीत असतात. ती लक्ष्मी तुमच्या वक्षःस्थळावर स्थान मिळालेले असतानाही तुमच्या चरणांवर वाहिलेल्या तुळशी बरोबर तुमच्या चरणांची धूळ प्राप्त करण्याची अभिलाषा बाळगते. कारण सर्व भक्तांनी तिचे सेवन केले आहे. म्हणून आम्ही सुद्धा त्याच तुमच्या चरण धुळीला शरण आलो आहोत.

तन्नः(फ्) प्रसीद वृजिनार्दन तेऽङ्घ्रिमूलं(म्),

प्राप्ता विसृज्य वसतीस्त्वदुपासनाशाः ।

त्वत्सुन्दरस्मितनिरीक्षणतीव्रकाम-

तप्तात्मनां(म्) पुरुषभूषण देहि दास्यम् ॥ 38॥

वसतीस्+ त्वदुपा+ सनाशाः, त्वत्+ सुन्दरस्+ मितनिरी+ क्षणतीव्र+ काम

हे दुःखनाशना! आता आमच्यावर कृपा करा. तुमच्या सेवेच्या अभिलाषेने आम्ही घर सोडून तुमच्या चरणांजवळ आलो आहोत. हे पुरुषोत्तमा! तुमचे मधुर स्मित आणि प्रेमळ नेत्रकटाक्षाने आमच्या हृदयामध्ये मिलनाच्या आकांक्षाची आग भडकली आहे. आम्हाला केवळ आपल्या सेवेची संधी द्या.

वीक्ष्यालकावृतमुखं(न्) तव कुण्डलश्री-

गण्डस्थलाधरसुधं(म्) हसितावलोकम् ।

दत्ताभयं(ञ्) च भुजदण्डयुगं(वँ) विलोक्य,

वक्षः(श्)श्रियैकरमणं(ञ्) च भवाम दास्यः ॥ 39॥

वीक्ष्या+ लका+ वृतमुखं(न्), गण्डस्+ थला+ धरसुधं(म्), वक्षः(श्)+ श्रियै+ करमणं(ञ्)

प्रियतमा! ज्याच्यावर कुरळे केस भुरभुरत आहेत, असे तुमचे सुंदर मुखकमल, कुंडलांनी शोभणारे गाल, अधरामृत, स्मितहास्ययुक्त कटाक्ष, शरणागतांना अभय देणारे बाहू आणि तुमचे केवळ लक्ष्मीलाच रमविणारे हे वक्ष:स्थळ पाहून आम्ही तुमच्या दासी झालो आहोत.

का स्त्र्यङ्ग ते कलपदायतमूर्च्छितेन,

सम्मोहिताऽऽर्यचरितान्न चलेत्त्रिलोक्याम् ।

त्रैलोक्यसौभगमिदं(ञ्) च निरीक्ष्य रूपं(यँ),

यद् गोद्विजद्रुममृगाः(फ्) पुलकान्यबिभ्रन् ॥ 40॥

कलपदा+ यतमूर्च् + छितेन ,सम्मोहिताऽऽर्+ यचरितान्+ न ,त्रैलोक्यसौ+ भगमिदं(ञ्)

गोद्विज+ द्रुम+ मृगाः(फ्) ,पुलकान्+ यबिभ्रन्

प्रिय शामसुंदरा! त्रैलोक्यात तरी अशी कोणती स्त्री असेल की, जी तुमच्या बासरी वरील मधुर पदे आणि दीर्घताण ऐकून, तसेच गाई, पक्षी, वृक्ष आणि हरिण यांना सुद्धा रोमांचित करणारे त्रैलोक्य सुंदर रूप पाहून आर्यमर्यादेपासून विचलित होणार नाही!

व्यक्तं(म्) भवान् व्रजभयार्तिहरोऽभिजातो,

देवो यथाऽऽदिपुरुषः(स्) सुरलोकगोप्ता ।

तन्नो निधेहि करपं(ङ्)कजमार्तबन्धो,

तप्तस्तनेषु च शिरस्सु च किं(ङ्)करीणाम् ॥ 41॥

व्रजभयार्+ तिहरोऽ+ भिजातो ,करपं(ङ्)कज+ मार्तबन्धो

जसे नारायण देवतांचे रक्षण करतात, तसेच तुम्ही खात्रीने व्रज मंडलाचे भय आणि दुःख नाहीसे करण्यासाठीच प्रगट झालेले देव आहात. म्हणून दुःखितांचे कनवाळू हे प्रियतमा! आपल्या या दासींच्या दुःखतप्त वक्षः स्थळावर आणि मस्तकावर तुम्ही आपले कोमल करकमल ठेवा.

श्रीशुक उवाच

इति विक्लवितं(न्) तासां(म्), श्रुत्वा योगेश्वरेश्वरः ।

प्रहस्य सदयं(ङ्) गोपी- रात्मारामोऽप्यरीरमत् ॥ 42॥

रात्मा+ रामोऽप्यरी+ रमत्

श्रीशुक म्हणतात- योगेश्वरांचे ईश्वर असणाऱ्या श्रीकृष्णांनी गोपींची व्यथा ऐकली, तेव्हा त्यांची त्यांना करुणा आली आणि जरी ते आत्माराम असले तरीसुद्धा हसून ते त्यांच्याबरोबर रममान झाले.

ताभिः(स्) समेताभिरुदारचेष्टितः(फ्),

प्रियेक्षणोत्फुल्लमुखीभिरच्युतः ।

उदारहासद्विजकुन्ददीधितिर्-

व्यरोचतैणां(ङ्)क इवोडुभिर्वृतः ॥ 43॥

समेता+ भिरुदा+ रचेष्टितः(फ्), प्रियेक्षणोत्+ फुल्+ लमुखी+ भिरच्युतः

उदा+ रहासद्+ विजकुन्+ ददी+ धितिर् ,इवो+ डुभिर्+ वृतः

प्रियतमाच्या दर्शनाने ज्यांची मुख कमली प्रफुल्लित झाली आहेत अशा, एकत्र जमलेल्या त्या गोपींबरोबर उत्कृष्ट हावभाव करणारे श्रीकृष्ण जेव्हा खुलून हसत, तेव्हा त्यांच्या कुंद कळ्यांसारख्या दातांचे शुभ्र किरण बाहेर पडत. त्यामुळे त्या तारकांनी भिडलेल्या चंद्राप्रमाणे शोभत होते.

उपगीयमान उद्गायन्, वनिताशतयूथपः ।

मालां(म्) बिभ्रद् वैजयन्तीं(वँ), व्यचरन्मण्डयन् वनम् ॥ 44॥

वनिता+ शत+ यूथपः ,व्यचरन्+ मण्डयन्

शेकडो गोपींच्या समूहांचे स्वामी श्रीकृष्ण वैजयंती माळ धारण करून, वृंदावनाला शोभा आणित विहार करू लागले. त्यावेळी गोपी आपल्या प्रियतमाचे गुणगान करीत; तर श्रीकृष्ण गोपींचे गुण गात.

नद्याः(फ्) पुलिनमाविश्य, गोपीभिर्हिमवालुकम् ।

रेमे तत्तरलानन्द- कुमुदामोदवायुना ॥ 45॥

पुलिनमा+ विश्य, गोपीभिर्+ हिमवा+ लुकम् ,तत्+तरलानन्द ,कुमुदा+ मोदवायुना

यानंतर श्रीकृष्णांनी गोपींसह, शुभ्र वाळू असणाऱ्या यमुनेच्या वाळवंटात जाऊन क्रीडा केली. ते वाळवंट हालल्यामुळे आनंद देणाऱ्या कुमुदिनींच्या सुगंध युक्त वाऱ्याने सुवासित झाले होते.

बाहुप्रसारपरिरम्भकरालकोरु-

नीवीस्तनालभननर्मनखाग्रपातैः ।

क्ष्वेल्यावलोकहसितैर्व्रजसुन्दरीणा-

मुत्तम्भयन् रतिपतिं(म्) रमयाञ्चकार ॥ 46॥

बाहुप्रसा+ रपरिरम्+ भकरा+ लकोरु, नीवीस्+ तना+ लभननर्+ मनखाग्र+ पातैः

क्ष्वेल्या+ वलो+ कहसितैर्+ व्रजसुन्दरीणा ,मुत्+ तम्भयन्

हात पसरून आलिंगन देणे, गोपींचे हात, वेणी, मांड्या, कमरपट्टा, त्यांना वगैरे अंगांना स्पर्श करणे, विनोद करणे, नखे लावणे, कटाक्ष टाकणे, स्मित हास्य करणे इत्यादी क्रीडांनी गोपींचा दिव्य प्रेम भाव उत्तेजित करीत श्रीकृष्ण त्यांना रमू लागले.

एवं(म्) भगवतः(ख्) कृष्णाल्- लब्धमाना महात्मनः ।

आत्मानं(म्) मेनिरे स्त्रीणां(म्), मानिन्योऽभ्यधिकं(म्) भुवि ॥ 47॥

मानिन्योऽभ्+ यधिकं(म्)

अनासक्त असूनही भगवान श्रीकृष्णांकडून जेव्हा गोपींना असा मान मिळाला, तेव्हा त्या जगातील सर्व स्त्रियांमध्ये आपण सर्वश्रेष्ठ आहोत, असे समजू लागल्या.

तासां(न्) तत् सौभगमदं(वँ), वीक्ष्य मानं(ञ्) च केशवः ।

प्रशमाय* प्रसादाय, त*त्रैवान्तरधीयत ॥ 48॥

तत्रैवान्+ तरधीयत

त्यांना आपल्या भाग्याचा गर्व झालेला असून अहंकारही उत्पन्न झाला आहे, असे जाणून त्यांचा गर्व नाहीसा करून त्यांच्यावर कृपा करण्यासाठी श्रीकृष्ण तेथेच अंतर्धान पावले.

इति* श्रीम*द्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)
दशम*स्क*न्धे पूर्वार्धे भगवतो रास*क्रीडावर्णनं(न्) नामैकोन*त्रिं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुद*च्यते
पूर्*णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशि*ष्यते।।
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।